ISSN No-2231-5063 Vol.1,Issue.IX/March 2012;pp.1-4

Research Paper

'राष्ट्रसंताच्या साहित्यातील कृषिचिंतन आणि आधुनिक साहित्यातील कृषकांची दुरावस्था'

डॉ.पंजाब पुंडकर
मराठी विभाग प्रमुख
महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी
चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरूड

प्रस्तावना :–

साहित्य हे समाजजीवनावर आधारित असते किंवा समाज जीवनाच्या अनुशंगानेच त्याची निर्मिती होत असते. त्यामुळे साहित्यातून प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे समाजजीवनाचे प्रतिबिंब हे उमटतच असते त्याप्रमाणे आजचे जीवन, कृषिजीवन, कृशकांची अवस्था इत्यादीचे संदर्भ घेऊन जीवन–जाणिवा साहित्यातून आविश्कृत होत आहेत. मराठी साहित्यात विशेषतः ग्रामीण साहित्यात या जाणिवा प्रकर्शाने जाणवतात. 'ग्रामीण जीवन, ग्रामजीवनाच्या समस्या, रूढी, प्रथा, परंपरा, भाव–भावना इत्यादी संदर्भात ग्रामीण जाणिवेतून निर्माण होणारे साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य होय'. अशी ग्रामीण साहित्याची संकल्पना मांडली जाते. मराठी साहित्यात ग्रामीण लोकजीवनाचे प्रतिबिंब महात्मा ज्योतीबा फुले यांच्या साहित्यात पडलेले दिसते.

शेतकरी, कष्टकरी वर्गाच्या समस्या व त्यावरील उपाय त्यांनी सुचविले आहेत. त्याचबरोबर सत्यशोधकी चळवळीतील सहकार्यांनीही असेच लेखन केलेले आहे. महात्मा ज्योतिबांनी 'तृतीय रत्न' या नाटकातून शेतकऱ्याचे, धर्माच्या माध्यमातून कसे शोषण होते याचे चित्रण केलेले आहे. 'कुळंबीण' या अखंडातून परिणामकारक चित्र त्यांनी रेखाटले आहे. शेतकऱ्याचा आसूड या ग्रंथात शेतकऱ्याचे सर्व बाजूंनी होणारे शोषण, त्याचे दारिद्रय, त्याची दयनीय अवस्था रेखाटून शेतीच्या उन्नतीसाठी उपायही सुचविले आहेत.

1920 नंतरच्या कालखंडात मराठी साहित्यात ग्रामीण जीवनाचे चित्रण कथा, कांदबरी, कविता इत्यादी स्वरूपात होऊ लागले. र.वा.दिवे, ग.ल. ठोकळ, म.भा.भोसले इत्यादींनी ग्रामीण जीवनाचे चित्रण रेखाटले परंतु त्यात ग्रामीण जीवनाचे प्रश्न, वास्तव चित्रण आले नाही. 1940 नंतर श्री.म.माटे यांनी ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण केले. 1945 नंतर मराठी नवकथेला प्रारंभ झाला. शंकर पाटील, द.मा.मिरासदार, रणजित देसाई, व्यंकटेश माडगुळकर इत्यादींनी ग्रामीण माणसांच्या मनाचे चित्रण केले. ग्रामीण जीवनातील दुःख, दारिद्रय, शोशण इत्यादीचे चित्रण त्यांच्या साहित्यातून होते. नवकथेनंतरच्या काळात ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारे महत्वाचे लेखक आनंद यादव, रा.रं. बोराडे, उध्दव शेळके, द.ता.भोसले, चंद्रकुमार नलगे, हमीद दलवाई, बाबा पाटील इत्यादींनी ग्रामीण जीवनातील दुःख, दैन्य, गरीब शेतकऱ्यांची होणारी परवड आणि कुचंबणा इत्यादीचे चित्रण केले.

यानंतर लोकजीवनातील वेगवेगळया सामाजिक स्तरामधून ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारे लेखक पुढे आलेत. त्यामुळे ग्रामीण जीवनाचे बहुविध चित्रण साहित्यामध्ये होऊ लागले. ना.धो.महानोर, भाश्कर चंदनशिव, वासुदेव मुलाटे, नागनाथ कोतापल्ले, श्रीराम गुंदेकर, इंद्रजित भालेराव, सदानंद देशमुख, पुरूशोत्तम बोरकर, बाबाराव मुसळे, विठठल वाघ, प्रतिमा इंगोले, रमेश इंगळे, शंकर बढे, मोहन पाटील, अनंत भोयर इत्यादींनी ग्रामीण समाज वास्तवाचा वेध घेतला. आज ग्रामीण समाज व्यवस्थेसमोर अनेक प्रश्न आहेत. या प्रश्नामुळे समाजव्यवस्था पोखरली जात आहे. वाढते शहरीकरण, वाढती बेकारी, राजकारणाच्या कैचीत सापडलेले ग्रामीण जीवन, संकरित वाण, खते–किटकनाशके यांचा अतिवापर आणि त्यामुळेच जमिनीचा गेलेला कस, व्यसनाधिनता, अज्ञान, दारिद्रय, जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण इत्यादी समस्यांमुळे खेडयातील जनजीवन भयावह होत आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे. असे आम्ही मोठया अभिमानाने सांगतो पण आज कृषी आणि कृषकांची काय अवस्था आहे?मराठवाडा आणि विदर्भातील शेतकरी दररोज आत्महत्या करतो आहे. कोणत्याही वर्तमानपत्राच पान उघडलं की, शेतकरी आत्महत्येची बातमी असतेच असते ही आमच्याकरिता चिंतेची आणि चिंतनाची बाब आहे.

मराठी साहित्यात खेडयातील शेतकरी, कष्टकरी वर्गाचे वास्तवदर्शी चित्रण आलेले आहे. आपल्या प्रतिभासामर्थ्याने कृषकाचे यथार्थ वास्तव चित्रण कलाकृतीतून अभिव्यक्त झाले. सहित्य ही एक कलाकृती आहे म्हणून साहित्याकडून उद्‌बोधन, उपाय इत्यादी प्रयोजनाच्या अपेक्षांच्या करणे चुकीचे ठरेल. परंतु असामान्य प्रतिभावंत वास्तव चित्रणाबरोबरच विविध उपाय योजना आपल्या कृती–उक्तीतून सांगतो तेव्हा ते साहित्य विश्वात्मक होऊन जाते. युगप्रवर्तक साहित्य ठरते. याचा प्रत्यय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची भजने, भाशणे–प्रवचन व त्यांच्या अंतहृद्‌यातून स्फुरलेली 'ग्रामगीता' यातून होतो.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या साहित्यात शेती, शेतकरी, कष्टकरी, ग्रामीण परिसर, गावगाडा, रूढी, प्रथा, परंपरा, ग्रामीण माणसांची मनोवृत्ती, त्यांच्या भावभावना, व्यथा, वेदना इत्यादी चित्रण तर केलेच त्यांच्या समस्या साहित्यातून व्यक्त केल्याच त्याचबरोबर यावर उपायही सुचविले आहेत.

प्रस्तुत ठिकाणी राष्ट्रसंताच्या अंतःहृदयातून उमललेल्या कोमलपुष्परूपी 'ग्रामगीता' ग्रंथातील कृषिचिंतन हा अभ्यासाचा विषय आहे. महाराज खेडयात जन्मले, वाढलेत, त्याच्यावर संस्कार झालेत ते सुध्दा खेडयातील त्यामुळे ग्रामजीवनातील गोतावळा आणि गावगाडा त्यांना चांगलाच ज्ञात होता आणि म्हणूनच 'बुडती हे जन न देखवे डोळा' या संत तुकारामाच्या उक्तीप्रमाणे शेतकरी, कष्टकरी यांच्या उध्दारासाठी त्यांच्या समृध्दीसाठी ग्रामगीतेचे प्रयोजन मानले आहे. खेडयातील माणसांना जागृत करण्यासाठी राष्ट्रसंतांनी 1954 साली ग्रामगीता लिहिली. येथील माणसांना आपले कर्तव्य व त्याचबरोबर हक्काची जाणीव राष्ट्रसंतांनी लोकांना करून दिली. या ग्रामनाथालाच राष्ट्रसंतांनी ग्रामगीता अर्पण केली. अर्पण पत्रिकेत 'जगाचा पोशिंदा' अर्थात शेतकऱ्याबद्दल कृतज्ञतापूर्वक राष्ट्रसंत म्हणतात.

सर्व ग्रामासी सुखी करावे ! अन्न वस्त्र–पात्रादी द्यावे
परि स्वतः दुःखचि भोगावे ! भूशण तुझे ग्रामनाथा ! !

राष्ट्रसंतांनी कृशिजीवनाचा जाहिरनामा ग्रामगीतेतून मांडला आहे. वर्णव्यवस्था, संघटनशक्ती, ग्रामरक्षण, ग्रामशुध्दी, ग्रामनिर्माण कला, ग्राम–आरोग्य, गोवंश सुधार, गरिबी–श्रीमंती, जीवन शिक्षण, सणोत्सव, ग्राम कुटुंब, भू–वैकुंठ इत्यादी अध्यायातून राष्ट्रसंतांनी शेतकरी व कष्टकरी वर्गाला मार्ग सांगितला आहे. ग्रामगीतेच्या प्रयोजनाविशयी राष्ट्रसंत म्हणतात.....

गावची करावी आदर्श व्यवस्था ! म्हणोनी कथिली ग्रामगीता
ग्रामापासौनि पुढे वाढता ! विश्वव्यापी व्हावे !! 49!!

ग्रामीण लोकसंस्कृती ही कृषिप्रधान संस्कृती आहे. या संस्कृतीचा नायक शेतकरी, कष्टकरी ठरतो. हा नायक सुखी–समृध्द असेल (भूक, दारिद्रय, अज्ञान, शोशण विरहित) तरच देशाचा विकास होऊ शकतो. तद्‌कालीन पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनी 'जय जवान जय किसान' हा नारा दिला होता. हा त्याचाच द्योतक आहे. अर्थात ज्या देशाचा किसान सुखी–समृध्द असेल त्याच देशाचा विकास होणार, ही दुरदृष्टी त्यांच्याजवळ होती. महात्मा गांधींनी सुध्दा ग्रामस्वराज्याची संकल्पना मांडली. 'खेडयाकडे चला' ही चळवळ म.गांधींनी राबविली. राष्ट्रसंतांनी सुध्दा ग्रामगीतेच्या माध्यमातून खेड्यापाड्यातून ग्रामोन्नतीची चळवळ आपल्या कृती–उक्तीतून राबविली. 'गाव हाच देशाचा कणा आहे'. जर गाव समृध्द असेल तरच देश समृध्द होऊ शकतो. ही राष्ट्रसंतांची तळमळ होती. परंतु आज ग्रामीण लोकजीवनाचे चित्रण वेगळेच दिसते. आजची खेडी कंगाल होत आहेत. कधी निसर्ग, कधी सरकार, कधी मध्यस्थ ह्यांच्याव्दारे शेतकरी, कष्टकऱ्याचे सतत शोषण होत आहे. आजचे जागतिकीकरण, शहरीकरण, खाजगीकरण, उदारीकरण इत्यादी माध्यमाव्दारे ग्रामीण लोकजीवन उद्‌ध्वस्त होत आहे.

Please cite this Article as : *डॉ.पंजाब पुंडकर,'राष्ट्रसंताच्या साहित्यातील कृषिचिंतन आणि आधुनिक साहित्यातील कृषकांची दुरावस्था'* **: Golden Research Thoughts (March ; 2012)**

Vol.1,Issue.IX/March 2012;pp.1-4

राष्ट्रसंतांनी आपल्या समग्र साहित्यातून ग्रामीण कृषिसंस्कृतीचे वास्तव चित्रण करून कृषकाच्या समस्या मांडल्यात. राष्ट्रसंत येथेच थांबले नाहीत या समस्यावर उपायही सुचविले विशेषतः ग्रामगीतेत सुचविलेल्या ग्रामाच्या उन्नतीचे मार्ग जर आम्ही प्रत्यक्ष आचरणात आणले तर गाव आणि पर्यायाने देश समृध्द झाल्यावाचून राहणार नाही.

गाव हा विश्वाचा नकाशा ! गावावरून देशाची परीक्षा !
गावची भंगता येईल अवदशा ! येईल देशा !! 49 !!

शेतकरी, कष्टकरी वर्गाच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळाली पहिजे असे राष्ट्रसंत म्हणतात. खेडयातला शेतकरी, शिंपी, सुतार इत्यादी अलुतेदार–बलुतेदार 'रक्ताचं पाणी अन् हाडाचे मणी' करतात. पण आज त्यांच्या वाटयाला दारिद्रय आलेले आहे. श्रम करणाऱ्या माणसाच्या श्रमाला प्रतिष्ठा नाही. त्याची सतत लुट आहे. मंदिरात जाऊन पुजा, कीर्तन, प्रवचन करण्यापेक्षा शेतीत श्रम करावे हेच खरे पुण्य आहे असे राष्ट्रसंत म्हणतात.

एक हात खोदावी जमीन ! हे पुजनाहुनि पुजन!
परिणाम शेकडो व्याख्यानातून ! अधिक तयाचा !! 20!!

ग्रामगीतेच्या अठराव्या अध्यायात श्रम प्रतिष्ठेतून गाव स्वयंपूर्ण कसे होईल याचा मुलमंत्र त्यांनी दिला. गावातील पारंपरिक उद्योग पुन्हा नव्याने सुरू व्हावेत. किटकनाशके, संकरित बियाणे, रासायनिक खत इत्यादीमुळे आमची पारंपरिक पिक नश्ट झाली. जमिनीचा कस गेला, हे सर्व या देशातील उद्योगपतीच्या, भांडवलदारांच्या पैशाच्या जोरावर सुरू आहे. शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही. सर्व बाजुने शेतकऱ्यांचे शोषण सुरू आहे. याचेही वर्णन राष्ट्रसंत करतात.

कच्चा माल मातीच्या भावे ! तो पक्का होता चौपटीने घ्यावे
मग ग्रामजन कैसे सुखी व्हावे ! पिकवोनीही तो उपाशी !! 9!!

असे चित्र आज शेतकऱ्याचे आहे. हे दारिद्रय संपवायचे असेल तर सर्वप्रथम उद्योगाला चालना मिळावी. गावातील तरूणांनी निरोगी असावे. कोणत्याही व्यवसानाच्या आहारी जाऊ नये. निरोगी तरूणच उद्योग करू शकतात. तरूण हा उद्योगी व चारित्र्य संपन्न झाला तर गाव आदर्श होईल. असे राष्ट्रसंत म्हणतात.

म्हणौनि प्रत्येकाने आपुल्या गावी ! ग्रामीण वस्तुना चालना द्यावी !
त्यात सुधारणाही घडवावी ! उन्नती व्हाया कलावंताची !!1!!

अठराव्या अध्यायात (श्रम संपत्ती) राष्ट्रसंत म्हणतात. प्रत्येक गावातील तरूणांनी प्रतिज्ञा करावी आपल्या गावात ज्या वस्तू तयार होतात त्याच आम्ही वापरू यामुळे ग्रामीण उद्योगाला चालना मिळेल. त्यांच्या हातांना काम मिळेल. आज घडीला नामशेष होत चाललेल्या ग्रामीण लोककला, उद्योगांना नवसंजिवन देणारा मुलमंत्र राष्ट्रसंत देतात. शहरीकरणाच्या प्रक्रियेत आज खेडी ओस पडू लागली आहेत. याचे प्रतिबिंब अठराव्या अध्यायात आहे.

शहराकडे चालला प्रवाह ! तो थांबवावा निःसंदेह!
सर्वांचा गावीच होईल निर्वाह ! ऐसी योजना करावी !!105!!

खेडयातला शिक्षित तरूण शहराच्या ओढीने झपाटला आहे. त्याला असे वाटते शहरात कमी श्रमात चांगला पैसा मिळतो. तो तिकडे जातो. पण तिथेही त्याची निराशा होते. बेकारीची समस्या सर्वत्रच आहे म्हणून राष्ट्रसंत आजच्या शिक्षित ग्रामीण तरूणांना म्हणतात. शेतीशिवाय पर्याय नाही. आपल्या अद्ययावत ज्ञानाचा शेतीच्या विकासाकरिता उपयोग करावा. शेतीमुळेच देशाचे भवितव्य उज्वल होईल.

शेतीसाठी उपयुक्त असणारे गाई–गुरांचे मल–मुत्रादि खतांचे नियोजन व ग्रामशुध्दी यावर राष्ट्रसंतांनी प्रकाश टाकला आहे. रासायनिक खतांमुळे जमिनीचा कस गेला तो पुन्हा आपल्याला परत आणायचा आहे. त्याकरिता राष्ट्रसंत ग्रामशुध्दी या बाराव्या अध्यायात विवेचन करतात.

मुत्रविश्टाहड्डी मिसळली ! त्याने भूमीस स्फुर्ती चढली !!
पुन्हा पेरणीकरिता उद्‌भवली ! प्रचंड कणसे !! 64!!

मल–मुत्रादि संकलनासाठी खेडयातील सर्व जनतेने गावाबाहेर खड्डे करावे त्यात याची व्यवस्था लावावी. खेडयात रस्त्यारस्त्यावर मानवी विश्ठेचा खच पडलेला असतो, रस्ते घाणीने माखलेले असतात. त्यामुळे खेडयात साथीचे रोग पसरतात. अशा आजारावर खेडयातील माणसाच्या एकूण उत्पन्नापैकी 40 टक्के खर्च आरोग्यउपचारावर होतो. हे टाळण्यासाठी घराघरात किंवा गावाबाहेर पेवसंडास बांधावेत. कर्मयोगी गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी 'रोगाची जननी हे गोदरी आहे' ही विज्ञानवादी दृष्टी आम्हाला दिली. याच मलमुत्राचा आपण आपल्या शेतीसाठी उपयोग केला पाहिजे. त्याचे योग्य नियोजन त्यांनी सांगितले.

ग्राम अशुध्दीमुळे गावात साथीचे आजार होतात. परंतु खेडयातील लोकांचे अज्ञान त्यामुळे या साथीच्या रोगाला देवाचा प्रकोप मानतात. ही अंधश्रध्दा आहे असे राष्ट्रसंत म्हणतात.

गाव असो वा शहर ! तेथील बिघडले आचार विचार
म्हणोनीच रोगराईने बेजार ! जाहले सारे जनलोक !!21!!

खेडयात लोकांचा आहार, अशुध्दी पाणी, घाणीचे साम्राज्य यामुळे आजार वाढतात. राष्ट्रसंत या अंधश्रध्देबाबत म्हणतात. कोंबडया बकऱ्यांचा यासाठी बळी देणे ही अंधश्रध्दा आहे. अशाने देव प्रसन्न होत नाही. मराठी संतांनी देव

Please cite this Article as : *डॉ.पंजाब पुंडकर,'राष्ट्रसंताच्या साहित्यातील कृषिचिंतन आणि आधुनिक साहित्यातील कृषकांची दुरावस्था'* **: Golden Research Thoughts (March ; 2012)**